MHBI060002062026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६८/२०२६ मधील नि.क्र. खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला असुन अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांच्याकडुन अर्जाच्या विनंती की, या सदराखाली केलेल्या मागणीच्या मजकुरात पहिल्या ओळीत मयत गणपत झटींग माने, रा. लाल नगर, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड हा मजकुर जास्तीचा व अनावश्यक टंकलीखीत झालेला आहे. त्यामुळे सदर मजकुर वगळण्याची परवानगी देण्यात यावी. अर्जदाराच्या कथनानुसार अर्ज मंजुर झाल्यास अर्जाचे स्वरूप बदलणार नाही. सदर अर्जाच्या पुष्ठर्थ अर्जदार यांनी निशाणी क्र. **१६** अन्वये शपथपत्र सादर केले आहे.

३. अर्ज, अर्जदार यांचे शपथपत्र व अभिलेखावरील कागदपत्र यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांच्याकडुन तरी विनंती की, या सदराखाली केलेल्या मागणीच्या मजकुरात पहिल्या ओळीत मयत गणपत झटींग माने, रा. लाल नगर, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड हा मजकुर जास्तीचा व अनावश्यक टंकलीखीत झालेला आहे, त्यामुळे सदर मजकुर वगळण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. सबब, तसा मजकुर वगळण्याची परवानगी देणे योग्य होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. निशाणी क्र. येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी अर्जामध्ये वर नमुद मजकुर वगळावा.

३. अर्जातील प्रस्तावित दुरुस्ती अर्जदार यांनी १४ दिवसांच्या आत करावी व दुरूस्ती अर्जाची प्रत अभिलेखावर सादर करावी.

सही/-

स्थळ-अंबाजोगाई (ए.एम.ढवळे )

दिनांक ०४.०२.२०२६ प्रभारी २रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

अंबाजोगाई

**<u>प्रमाणपत्र</u>**

<u>मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.</u>

**लघुलेखक ग्रेड-३** **ए.एस.गंगणे**

न्यायालयाचे नाव ३रे सह दिवाणी न्यायालय क. स्तर, अंबाजोगाई

न्यायनिर्णयाची तारीख ०४.०२.२०२६

न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख ०४.०२.२०२६

न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख ०४.०२.२०२६

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANGANE ANKUSH SADASHIV
Date: 2026.02.04 16:28:26 +0530

सहा/-
(ए.एस.गंगणे )
लघुलेखक ग्रेड-३
३रे सह दिवाणी न्यायालय क. स्तर, अंबाजोगाई